


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूली धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


वर्ष १६ पुणें. बुधवार तारीख १५ मार्च, १९५० अंक ११




## देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी २ डाळीची गिरणी ३ उसाचे चरक
४ चक्क्या ५ गोल करवत (लाकडें कापण्याकरितां) ६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स लिमिटेड
भिवंडी जि. ठाणें
व्हाया-कल्याण ( जी. आय. पी. रेल्वे )



( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

## दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेंचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.
के. डी. शिराळकर मॅनेजर

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ४१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४३,००,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन
श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर

# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

**केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.**


## विविध माहिती

**ब्रिटनचें पोलादाचें उत्पादन**—ब्रिटनचें पोलादाचें उत्पादन वार्षिक १,६१,७६,००० टन इतकें वाढलें आहे. आतांपर्यंतच्या वार्षिक उत्पादनांत हें सर्वांत अधिक आहे. लोखंडाचें उत्पादनही वाढलें आहे. १९४८ सालीं ९४,२२,००० टन लोखंडाचें उत्पादन झालें होतें. १९४९ सालीं ९५,८८,००० टन उत्पादन झालें.

**सौराष्ट्रांत बेकारीची लाट**—सौराष्ट्रांतून १९४९ च्या डिसेंबरांत आणि १९५० च्या जानेवारींत शेंगदाण्याची फार मोठ्या प्रमाणावर निर्यात करण्यांत आली. ह्या निर्यातीमुळें शेंगदाण्याच्या गिरण्यांना शेंगदाणा मिळत नाहींसा झाला. त्यामुळें गिरण्या बंद पडून हजारो कामगार बेकार होत आहेत. शेंगदाण्याची निर्यात थांबविण्यासाठीं मध्यवर्ती सरकारकडे तारा करण्यांत आल्या आहेत.

**अनाथ अपंगांसाठीं सोय**—कानपूरच्या म्युनिसिपालिटीनें शहरांतील अपंग आणि दरिद्री लोकांसाठी एक 'अपंग–गृह' बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या गृहासाठी १ लाख रुपये खर्च येईल आणि त्यांत २०० अपंगांची सोय होईल.

**इंग्लंडच्या राजाची ऑस्ट्रेलिआला भेट**—इंग्लंडचे राजे जॉर्ज आणि राणीसाहेब हें दांपत्य १९५२ च्या वसंत ऋतूंत ऑस्ट्रेलिआला भेट देणार आहे असें समजतें.

**मद्रास सरकारचे गुळावर निर्बंध**—मद्रास सरकारनें आपल्या राज्यांतून, परवाना घेतल्याशिवाय गूळ बाहेर नेण्यास बंदी केली आहे. अंतर्गत वाहतुकीवर मात्र कसलेंही बंधन नाहीं. ताडीपासून केलेल्या गुळाच्या वहातुकीला मात्र बाहेर नेण्यास बंदी नाहीं.

**दिगबोईजवळ तेलाची नवीन खाण**—दिगबोईपासून थोड्या मैलांवर आसाम ऑइल कंपनीला तेलाची एक नवीन खाण सांपडली आहे असें समजतें. मार्च महिन्यांत ह्या ठिकाणीं तेलाची विहीर खोदण्यास प्रारंभ होईल. तेल खरोखरच सापडल्यास तेथील डोंगरांत तेलासाठी आणखी शोध करण्यांत येणार आहे.

**गुरांचें प्रदर्शन**—बडोद्याजवळील बोडेली ह्या गांवीं गुरांचें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शनांत भाग घेतलेल्या उत्तम गुरांसाठी, त्याचप्रमाणें उत्तम प्रकारचें बी–बियाणें, भाजीपाला आणि फळें ह्यांच्यासाठी बक्षिसें वाटण्यांत आलीं. प्रदर्शनाला १०,००० लोक येऊन गेले.

**पंजाबला भारत सरकारची मदत**—भारत सरकारकडून पंजाब सरकारला येत्या फडणिशी वर्षासाठी ७५ लाख रुपयांची मदत मिळणार आहे असें समजतें. पंजाब सरकारनें १ कोटी, ७५ लाख रुपयांची मागणी केली होती.

**रुबलला सोन्याचें तारण**—रशिआचें चलन जो रुबल त्याला सोन्याचें तारण देणार असल्याचें मास्को नभोवाणीवरून जाहीर करण्यांत आलें. एका अमेरिकन डॉलरबद्दल ५·३ रुबल्स असा हुंडणावळीचा दर निश्चित करण्यांत आला आहे.

**भारतासाठी जर्मन एंजिनें**—भारत सरकारनें पश्चिम जर्मनींतील क्रप्स कारखान्याकडे बऱ्याच रेल्वे एंजिनांची मागणी नोंदविली आहे. हीं एंजिनें अरुंद रुळावर चालणारीं असतील. एंजिनांचा पहिला हप्ता १९५० अखेर अगर १९५१ च्या प्रारंभीं भारतांत येईल. युद्ध संपल्यापासून क्रप्स कारखान्याशीं व्यवहार केल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

**ताडीपासून गूळ**—राजस्थान सरकारनें ताडीपासून गूळ तयार करण्यासाठी २५ केंद्रें उघडण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक केंद्रांत २,००० ताडीच्या झाडांचा समावेश करण्यांत आला आहे. ह्या धंद्याचें शिक्षण १०० कामगारांना देण्यांत येणार आहे. सध्या मद्रास प्रांतांतील कडलोर येथें १५ कामगार शिकून तयार होत आहेत. आतांपर्यंत ताडीपासून ३२,००० पौंड गूळ तयार करण्यांत आला आहे.

**कॅनडाचा संरक्षणाचा खर्च**—१९५०–५१ सालचें कॅनडाचें अंदाज पत्रक नुकतेंच सादर करण्यांत आलें. अंदाज पत्रकांत संरक्षण खात्यासाठीं ४२·५ कोटी डॉलर्स मागण्यांत आले आहेत. गेल्या वर्षीं ही रक्कम ३८·३ कोटी धरण्यांत आली होती. रशिआ आणि कॅनडा ह्याच्यांत युद्ध झालें तर उत्तर ध्रुवाच्या प्रदेशांत पहिली आघाडी उघडली जाईल असें म्हणतात.

**इंग्लंडमधील मोटारींचे उत्पादन व निर्यात**—ब्रिटननें आपल्या मोटारीच्या धंद्याची पुनर्घटना करून त्या धंद्यांत बरेंच यश मिळविलें आहे. पोलाद कारखान्यांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यामुळें मोटारींचें उत्पादन बरेंच वाढून २,५८,००० खाजगी मोटारी आणि ९३,००० मालवाहू मोटारी ब्रिटनला परदेशी निर्यात करता आल्या. ह्याशिवाय यांत्रिक नांगर, मोटारींचे सुटे भाग, ह्यांचीही निर्यात करतां आली. १९४८ सालीं २,७५,००,००० पौंडांच्या किंमतीची निर्यात झाली होती. १९४९ सालीं १७,३४,४०,५५३ पौंडाची निर्यात झाली.

**जर्मनींतील सरकारी अधिकारी**—पश्चिम जर्मनींतील सरकारी नौकरासंबंधीं लोकांचें काय मत आहे हें ड्युसेलडॉर्फ येथील एका संस्थेनें नुकतेंच अजमावलें आहे. जर्मन लोकांना पोस्टमन सर्वांत बरे वाटतात. ६ टक्के लोकांचें मत पोस्टमनांच्या शिष्टाचारासंबंधीं प्रतिकूल असलें तरी २८ टक्के लोकांचें अनुकूल आहे. सगळ्यांत वाईट मत घरासंबंधीं अधिकाऱ्यांबद्दल आहे. फक्त ३ टक्के लोकांच्या मतानें हे अधिकारी वागणुकीला चांगले आहेत. २४ टक्के लोकांच्या मतानें ते तसे नाहींत. ह्या अधिकाऱ्यांच्या खालोखाल प्रतिकूल मत मजूरविषयक नौकर आणि बँकांतील नौकर ह्यांच्याविषयीं आहे.


—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी **खादी मन्दिर** २६२, बुधवार पेठ ढमढेरे बोळाजवळ, पुणें २.
—खादीचें माहेरघर—

# अर्थ

बुधवार, ता. १५ मार्च, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतांत बेकारी वाढूं लागली आहे

कोणत्याही आधुनिक राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेंत रोजगार करीत असलेल्या आणि रोजगार दिल्या गेलेल्या नागरिकांची नोंद ठेवण्याचें कार्य महत्त्वाचें असतें. भारतांत अशी नोंद ठेवणारीं जीं उद्योगविनिमय केंद्रें आहेत, त्यांच्या जवळ असलेली एतद्विषयक माहिती नुकतीच जाहीर करण्यांत आली आहे.

ह्या माहितीवरून असें दिसून येतें कीं, भारतांतील बेकारीचें प्रमाण वाढत आहे. १९४९ सालीं रोजगार पाहिजे म्हणून ८,७०,९०४ नागरिकांनीं आपलीं नांवें केंद्रांतून नोंदविलीं होतीं. १९४८ सालीं बेकारांची ही नोंद १०,६६,३५१ इतकी झालेली आहे. उलट, कामधंदा किंवा रोजगार दिले गेलेल्या लोकांची संख्या मात्र रोडावली असें दिसून आलें. १९४८ सालीं २,६०,०८८ लोकांना रोजगार दिला गेला. ही संख्या १९४९ सालीं २,५६, ८०९ पर्यंत खालीं आली. उत्तर प्रदेशांत काम नसलेल्या लोकांची सर्वांत अधिक नोंद झालेली आढळते. १९४८ सालीं उत्तर प्रदेशांत १,७४,८२९ बेकारांची नोंद झाली होती. १९४९ सालीं ह्या संख्येंत फार वाढ होऊन ती ३,०२,२१० इतकी फुगली. उलटपक्षीं नोकऱ्या दिल्या गेलेल्या लोकांच्या संख्येंतही मोठी घट झाल्याचें दिसतें. उत्तर प्रदेशांत १९४८ सालीं नोंदलेल्या बेकारांपैकीं १,०३,४४१ जणांना उद्योग देण्यांत आला. १९४९ साली मात्र ६१,५६३ लोकांनाच रोजगार मिळूं शकला. खालीं दिलेल्या तक्त्यांत इतर प्रांतांतील ह्यासंबंधींचे आंकडे दिले आहेत.

| | १९४९ | | १९४८ | |
|---|---|---|---|---|
| | नोंदलेले | रोजगार दिलेले | नोंदलेले | रोजगार दिलेले |
| मद्रास | १,९७,५८४ | ४०,७९३ | १,४२,३८४ | ४५,६९२ |
| मुंबई | १,१५,५३३ | २१,८६७ | ८४,०८६ | २१,७३३ |
| प. बंगाल | १,१५,३५८ | २०,८३९ | ११,७,०४७ | २५,५३५ |
| पू. पंजाब | १,०५,५३५ | ३३,९९५ | १,८२,७४० | ६९,८६९ |
| बिहार | ७८,७५४ | १४,०५३ | ४१,५७० | १२,८८९ |
| दिल्लीअजमीर | ७६,१३२ | १०,८११ | ७९,८८७ | ११,२६८ |
| मध्य-प्रदेश | ४९,१७८ | ६,६४० | ३१,५८१ | ५,२६५ |
| आसाम | १८,५९० | २,१८१ | १२,४४३ | ३,८३८ |
| ओरिसा | ७,४७७ | २,१८९ | ४,३३७ | २,४५६ |

१९४९ सालीं पूर्व-पंजाबांत नोंदल्या गेलेल्या बेकारांची संख्या त्यापूर्वीच्या वर्षाच्या मानानें एकदम बरीच कमी झालेली दिसून येते. ह्याचें कारण असें कीं, १९४८ सालीं बेकारांच्या नोंदीनें जास्तींत जास्त संख्या गांठली होती. पाकिस्तानांतून लाखों लोक पूर्व-पंजाबांत आल्यानेंच वरील नोंद १९४८ सालीं कमाल मर्यादेपर्यंत पोंचली हें उघड आहे.

नोंद केलेल्या बेकारांपैकीं जे लोक आपली बेकारी बेकार असेपर्यंत पुन्हां पुन्हां नोंदतात त्यांचें एक रजिष्टर उद्योगविनिमय-केंद्रांतून ठेवलेलें असतें. अशा लोकांपैकीं ३० टक्के लोक बिगर कुशल कामगार होते असें १९४८ सालच्या वरील प्रकारच्या रजिष्टरवरून दिसून येतें. १९४९ सालीं झालेल्या एकूण नोंदींत अशा कामगारांचें प्रमाण ४२.७ टक्के झाल्याचें दिसून येतें. सामान्य कामगारांनंतर कारकुनी पेशा लोकांचा नंबर लागतो. १९४८ सालीं ह्या पेशाच्या नोंदलेल्या लोकांपैकीं ३० टक्के बेकार होते. १९४९ सालीं ही टक्केवारी २८ वर आली. रोजगार दिलेल्या लोकांतही बिगर कुशल कामगारांची टक्केवारी अधिक दिसून येते. १९४९ सालीं नोकरी दिल्या गेलेल्या लोकांपैकीं ६० टक्के लोक सामान्य कामगार होते.

१९४९ सालीं भांडवलदार वर्गाकडून उद्योगविनिमय केंद्रांना पुरविण्यांत आलेल्या माहितीप्रमाणें ३,६२,०,११ नोकऱ्या रिकाम्या होत्या. १९४८ सालीं हीची संख्या ३,८०,८८५ इतकी कळविण्यांत आलेली होती. १९४९ सालीं एकंदरीनें नोकरीच्या जागा कमी कमी होत गेल्या. त्यांतही सरकारकडून नोकरांची मागणी ज्या मानानें कमी झाली त्यामानानें ती खाजगी भांडवलदारांकडून कमी झाली नाहीं. हे सर्व आकडे जे बेकार आपली तशी नोंद करून घेतात त्यांच्या संख्येवर आधारलेले आहेत. परंतु नोंद करून न घेणारेही लोक पुष्कळ असतात. तथापि उद्योग विनिमय केंद्रांच्या माहितीवरून रोजगारीसंबंधींची परिस्थिति कशी आहे ह्याची कल्पना येण्यासारखी आहे.

## मॅनेजिंग एजन्सीच्या नियंत्रणाखालील लिमिटेड कंपन्या

भारत सरकारनें हिंदी कंपनी कायद्यांत सुधारणा घडवून आणण्याचें ठरविलें आणि त्यासंबंधांत बिल तयार करण्यापूर्वीं त्यांतील मुख्य बाबी मेमोरॅंडमच्या रूपानें प्रसिद्ध करून त्यावर लोकांचें मत मागविलें. वास्तविक, लिमिटेड कंपन्यांसंबंधी आकडेवार माहिती असावी तेवढी उपलब्ध नाहीं. अगदीं ताज्या आकड्यांप्रमाणें, ३१ मार्च १९४७ रोजीं भारतांतील लिमिटेड कंपन्यांची संख्या २१,६५१ होती आणि त्यांचें वसूल भांडवल ४४५ कोटी, ४५ लक्ष रुपये होतें. सुमारें १५०० कंपन्यांच्या बाबत छाननी केली, त्यावरून लिमिटेड कंपन्यांत गुंतलेल्या एकूण भांडवलापैकीं ६६⅔% इतकें भांडवल मॅनेजिंग एजंटांच्या व्यवस्थेखालील कंपन्यांचें आहे. ह्या कंपन्यांतून बँका आणि विमा कंपन्या वगळल्या—कारण त्यांना कायद्याप्रमाणें मॅनेजिंग एजन्सी पद्धति निषिद्ध आहे—तर मॅनेजिंग एजन्सीच्या नियंत्रणाखालील कंपन्यांत गुंतलेल्या भांडवलाचें एकूण भांडवलाशीं प्रमाण ७५ ते ८०% इतकें होईल.

मॅनेजिंग एजन्सीपैकीं फर्म्स किती आहेत आणि लिमिटेड कंपन्या किती आहेत ह्याचा तपशील उपलब्ध नाहीं. टाटा इंडस्ट्रीज लि. नें सुमारें ४१५ कंपन्यांची मॅनेजिंग एजन्सी असलेल्या ६४ महत्त्वाच्या मॅनेजिंग एजन्सींची छाननी केली. ह्या ४१५ कंपन्यांत महत्त्वाचे सर्व उद्योगधंदे होते आणि त्यांचें वसूल भांडवल १३७ कोटी रुपये होतें. त्यांच्या ६४ मॅनेजिंग एजंटांपैकी ५३ लिमिटेड कंपन्या होत्या आणि त्यांच्या व्यवस्थेखाली

१३७ कोटींपैकी १३१ कोटी रुपये भांडवलाच्या कंपन्या होत्या. ह्या चांचणीवरून, मॅनेजिंग एजन्सीच्या व्यवस्थेखालील भांडवलापैकी ६०% भांडवल ज्यांचे व्यवस्थेखाली आहे, त्या एजन्सीच्या लिमिटेड कंपन्या आहेत, फर्म्स नाहींत. थोडक्यांत म्हणजे, मॅनेजिंग एजंटांचे व्यवस्थेखाली लिमिटेड कंपन्यांच्या भांडवलापैकी ६६३% भांडवल आहे आणि त्यापैकी ६०% भांडवल ज्यांची मॅनेजिंग एजन्सी लिमिटेड कंपनीकडे आहे, अशा कंपन्यांचें आहे.

## शेडयूल्ड बँकांची रिझर्व्ह बँकेकरवी तपासणी

बँकिंग कंपनीज कायद्यानें सांगितल्याप्रमाणें सर्व लहानमोठ्या बँकांची तपासणी करण्यास रिझर्व्ह बँक प्रारंभ करणार आहे. सध्यां ही तपासणी करण्यास आवश्यक तेवढा तज्ज्ञ नोकरवर्ग बँकेजवळ नसल्यानें, १९५० मध्यें सबंध भारतांतील फक्त कांहीं बँकांचीच तपासणी केली जाईल. तपासण्या हळुहळु वाढवीत जाऊन १९५२ अखेर सर्व बँकांची एक- तरी तपासणी पुरी करण्याचा रिझर्व्ह बँकेचा बेत आहे. रिझर्व्ह बँकेकरवी बँकांची तपासणी ही आतां नित्याची बाब होणार असल्यानें एखाद्या बँकेची तपासणी सुरू झाल्यावरून केवळ, तिचेसंबंधीं प्रतिकूल कल्पना कोणीही करून घेऊं नये.

१९५० मध्यें तपासल्या जाणाऱ्या बँकांचा उपलब्ध तपशील (१९४७ अखेर) खालीं दिला आहे. इंग्रजी अद्याक्षराप्रमाणें त्यांचा अनुक्रम लावलेला आहे. त्या अनुक्रमानें तपासणी होईल असें नाहीं.

| शेडयूल्ड बँक | स्थापना | वसूल भांडवल (लक्ष रु.) | ठेवी (लक्ष रु.) | भारतांतील शाखांची संख्या |
|---|---|---|---|---|
| बँक ऑफ इंडिया, मुंबई | १९०६ | १५० | ६८,६३ | ३२ |
| भारत बँक, दिल्ली | १९४२ | २०१ | १९,०१ | २५३ |
| कलकत्ता नॅशनल, कल. | १९३५ | ५० | ५,८९ | ५? |
| चार्टर्ड बँक (एक्सचेंज बँक) | ... | ३० (पौं.) | १,१० (पौं.) | ९ |
| इंपीरिअल, कल. | १९२१ | ५६२ | २८६,५८ | ४३७ |
| इंडियन बँक, मद्रास | १९०७ | ५२ | १८,१४ | ७० |
| नॅशनल, लाहोर | १९४७ | ५० | ५,१८ | ३६ |
| न्यू सिटिझन, मुंबई | १९३७ | १० | २,६८ | ४८ |
| युनायटेड कमर्शि., कल. | १९४७ | २०० | ३४,५५ | ८२ |

वरील यादींत एक एक्सचेंज बँक असून बाकीच्या आठ बँकांपैकीं दोघांची मुख्य कचेरी मुंबई येथें, एकाची दिल्ली येथें, तिघांची कलकत्ता येथें, एकाची मद्रास येथें व एकाची लाहोर येथें आहे

## सुपरटॅक्सच्या वाढींतून सहकारी सोसायट्यांना वगळा

"मध्यवर्ती व घटक राज्यें सहकारी चळवळीच्या वाढीसाठी कसून प्रयत्न करीत आहेत. निःस्वार्थी कार्यकर्ते सभासदांच्या हिताच्या दृष्टीनें सोसायट्यांचें काम पहात असतात. त्यांत नफ्याची दृष्टी नसते. सहकारी सोसायट्यांना मध्यवर्ती सरकारनें अगोदरच इनकमटॅक्स, रजिस्ट्रेशन फी इत्यादींची माफी दिलेली आहे. परंतु सरकारी रोख्यांत गुंतविलेल्या शिलकी रकमावर मात्र त्यांना इनकमटॅक्स पडतो. मध्यवर्ती अंदाजपत्रकांत, सुपरटॅक्सचा दर अर्ध्या आण्यानें वाढविण्यांत आलेला आहे, तो सहकारी सोसायट्यांना घातक ठरणार आहे. म्हणून, सुपरटॅक्सच्या ह्या वाढींतून सहकारी सोसायट्यांना वगळावें, अशी विनंति आहे.":-

मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिटयूटचे ऑ. सेक्रेटरी, श्री. वा. पु. वर्दे, ह्यांची भारत सरकारच्या अर्थमंत्र्यांस तार.


# सी. पी. अँड बेरार (मध्यप्रदेश) प्रोव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर.

स्थापनाः—१९१२.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. १०,१४,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ११,२६,००० |
| खेळतें भांडवल | रु.२,४९,६४,००० |

अध्यक्षः— सर माधवराव देशपांडे, के. बी. ई.

**बँकिंगचे सर्व व्यवहार होतात.**

बँकेचे शेअर्सची विक्री चालू आहे. गेल्या ४ वर्षांची मुनाफा वांटणी पांच दरानें केली.

सरकारची पूर्ण हमी असलेले शेंकडा तीन व्याजाच्या दराचे रोख्यांची विक्री चालू आहे. रोख्यांची मुदत १० व १५ वर्षांनीं भरेल.

विमा कंपन्या, बँका, म्युनिसिपालिट्या, शाळा, जमीनदार वगैरेंनीं वरील रोखे जरूर खरेदी करावेत.

गो. आ. भोंसुले,
मॅनेजर.



दी
# बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.]

स्थापनाः १९१६.

मुख्य कचेरीः

सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : १८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | १०,१६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहुपुरी-कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई-कोर्ट-(१०) मुंबई-मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. प. सावंत, जनरल मॅनेजर.

## मथाईचा " मध्यम वर्ग " कोणता ?

( श्री. व. वि. लाणकर, एम. ए., बी. कॉम. )

सध्या मध्यम वर्गाचे हाल पराकाष्ठेला पोहोंचले आहेत व त्याची कारणें न सांगतां समजण्यासारखीं आहेत. आतां मध्यमवर्ग कुणाला म्हणावें याबद्दल परवांचें डॉ. जॉन मथाईंचें बजेट आल्यापासून संशय उत्पन्न झाला आहे. हा वर्ग हलाखींत आहे आणि देशाच्या आर्थिक प्रगतीला जरूर बचत करत राहणारा व उद्योगास सतत भांडवलाचा पुरवठा करत राहणारा हा झरा आहे व तो आटू देतां कामा नये हें आपणास मान्य आहे, हे डॉ. मथाईंनीं वार्षिक पंधरा हजार रुपयांच्या उत्पन्न श्रेणींतील लोकांस प्राप्तीवरील कराच्या दरांत थोडी कपात करून दाखविलें आहे.

ज्या मध्यम वर्गाचें नांव घेऊन डॉ. मथाई सांगतात त्यांतील पुष्कळांना डॉ. मथाईच्या या नव्या योजनेमुळें गोंधळ झालेलें आहे व वर्तमानपत्रांत पत्रापत्री सुरू झाली आहे. या पत्रलेखकांचा मुख्य रोख डॉ. मथाईच्या मध्यम वर्गाच्या कल्पनेवर आहे. त्यांचे म्हणणें, पंधरा हजार रुपये वार्षिक उत्पन्नाचा माणूस मध्यम वर्गीय नसून श्रीमंत वर्गांतलाच व मध्यमवर्गाला सूट देण्याच्या नांवाखालीं मथाईंनीं श्रीमंत वर्गाला आणखी श्रीमंत होण्याला अवसर दिलेला आहे. या टीकेंत कितपत तथ्य आहे, तें पाहूं.

मध्यम वर्ग कोणाला म्हणावें ? त्याची कांहीं व्याख्या ठरलेली नाहीं. पण संकेतानें अमुक एक माणूस मध्यम वर्गांतला असें सहज मानण्यांत येतें. आपल्या इकडे मध्यम वर्ग म्हणजे पांढरपेशा वर्ग. जो शेती करीत नाहीं, जो व्यापार करीत नाहीं, कीं कारखानदारी करीत नाहीं, ज्यानें निर्वाहाचें साधन म्हणून नोकरी पेशा पत्करलेला आहे अगर वैद्यकी, वकिली, सावकारी अशा प्रकारचे हात काळे न होणारे धंदे चालवले आहेत, त्याला मध्यम वर्गीय समजण्यांत येतें. अर्थात या वर्गांत मोडणाऱ्यांची जी सरासरी वार्षिक प्राप्ति तितकी ज्याची असेल तो मध्यम वर्गीय. मध्यम वर्गाची सरासरी प्राप्ति काय याबद्दल कोणी संख्याशास्त्रीय संशोधन केलेलें दिसत नाहीं. प्राप्तिकर कायद्यांत सध्या वार्षिक तीन हजार रुपयांच्या मर्यादेपर्यंत कर माफ आहे. तेव्हां ज्यांचें उत्पन्न सालिना तीन हजारांच्या आंत आहे ते गरीब अथवा खालच्या वर्गांतील असा निष्कर्ष निघतो. तीन हजारांच्या मर्यादेपासून पंचवीस हजारांच्या मर्यादेपर्यंत प्राप्तीवरील कराचे दर साधे, पण वाढत वाढत जाणारे आहेत. पंचवीस हजारांच्या पुढें सुपर टॅक्स द्यावा लागतो. सुपर टॅक्स याचा अर्थ असा कीं कर देण्याची ऐपत याची बाजवीपेक्षा जास्त आहे. म्हणजे तो श्रीमंत आहे आणि ज्याला सुपर टॅक्स द्यावा लागत नाहीं व जो साधा कर भरतो तो 'श्रीमंत' नाहीं पण त्याची कर भरण्याची ऐपत आहे, तेव्हां तो मध्यम वर्गीय समजला पाहिजे. प्राप्तिकर कायद्याच्या दृष्टीनें तीन ते पंचवीस हजार उत्पन्नाची सर्व मंडळी मध्यम वर्गीय आहेत. पण सर्वसाधारणतः हें मान्य होणार नाहीं.

आपण रुपयाची सध्याची क्रयशक्ति लक्षांत घेतां असें म्हणतों कीं ज्याला साधारणतः महिना पांचशें रुपये पगार अगर प्राप्ति असेल तो सुखी समजावयास हवा. पुष्कळदां आपण असें ऐकतों कीं आपणास पांचशे रुपये पगार दिल्यास आपली कांहीं तक्रार नाहीं. याचा अर्थ असा कीं चालू बाजार भाव व सरासरी कुटुंबांतली मनुष्यसंख्या व त्यांच्या गरजा लक्षांत घेतां कुटुंबाचें दरसाल सहा हजार रुपयांत भागेल. तेव्हां अनुमान निघतें कीं सध्या दरमहा पांचशें रुपये किमान न मिळविणाराच फक्त आर्थिक दृष्ट्या सुखी मनुष्य आहे. म्हणजे आर्थिक वर्गवारी करतांना सहा हजार रुपयापासूनच इयत्तांची सुरवात धरली पाहिजे. सहा हजारांच्या खालच्यांना वर्गच नाहीं असें म्हटलें पाहिजे. पण ज्याअर्थी सहा हजारांच्या खालचे जगत आहेत त्याअर्थी त्यांना वर्ग हा दिलाच पाहिजे आणि तो खालचाच दिला पाहिजे. या ठिकाणीं हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं वर्गवारींत वार्षिक उत्पन्नच प्रमाणभूत धरलेलें आहे. ज्या पेशानें तें येत आहे त्याला महत्त्व नाहीं.

जर कुटुंबाच्या मुख्य गरजा व्यवस्थित रीतीनें भागण्याला आज वार्षिक सहा हजार रुपयांची गरज आहे तर प्राप्तिवरील कर सहा हजार रुपयांच्याच पुढें सुरू व्हावयास पाहिजे. म्हणजे सहा हजारापासून जसजसें उत्पन्न वाढत जाईल तसतशी कर देण्याची ऐपत वाढलेली राहील. अर्थात सहा हजारवाल्यांना कराचा किमान दर लावण्यांत आला पाहिजे. आतां ज्या अर्थी सहा हजारवाला आपण पहिला म्हणजे सुखी—म्हणजे गरजा अपूर्ण नसलेला—धरला आहे त्याअर्थी या मर्यादेपुढें हळूहळू चढत्या मांडणीनें माणसाला सुखवस्तुत्व धरावयास हवें. चक्र गरीब, जेमतेम भागवणारे, सुखवस्तु, (सुखवस्तु —सर्व दैनंदिन गरजा भागलेला ) त्यापुढें चार पैसे शिल्लक टाकणारे—त्यांची मर्यादा वार्षिक पंचवीस हजारापर्यंत—आणि सुपर टॅक्स देणारा तो श्रीमंत अशी आवल्याला वर्गवारी लावतां येईल. या पलीकडे लाखांनीं उत्पन्न असणारे ' महा श्रीमंत ' आणि दशलक्षांनीं उत्पन्न असणारें ' अति श्रीमंत ' म्हणावेत.

तेव्हां पंधरा हजार रुपये उत्पन्नवाल्यांना सूट देतांना तेच खरे मध्यमवर्गीय होत असें म्हणण्यांत डॉ. मथाई फारशी चूक करीत नाहींत असेंच म्हणावें लागतें. तुम्हीं आम्हीं स्वतःला मध्यम वर्गीय म्हणवतों तेंच वास्तविक चूक. मथाई श्रीमंत आहेत तेव्हां त्यांची मध्यमवर्गाबद्दलची कल्पना अवास्तव असा आरोप अनाठायीं होतो. तोच आरोप उलट दृष्टीनें आपणावरही करून घ्यावयास हवा. तो असा कीं, तुम्हीं आम्हीं स्वतःला मध्यम वर्गीय तरी कशाच्या जोरावर म्हणवून घेतों ? कां तर आम्ही डॉक्टर आहोंत, वकील आहोंत व आमचें उत्पन्न दरमहा अडीचशाच्या घरांत आहे या समजुतींत. अहो, सहा हजार रुपये वार्षिक उत्पन्न होस्तोवर तुम्हाला वर्गच नाहीं ! म्हणजे खरें पाहिलें असतां तुम्ही आम्ही दरिद्रीच आहोंत पण आपण मध्यमवर्गीय आहोंत, या कल्पनेंत अभिमान अभिप्रेत असल्यानें आपण त्याच्यांत स्वतःला टाकूं पाहतों. आमचा शाळा मास्तर शेती करीत नाहीं.( सालिना सहाशेंच मिळवतो ) तो मध्यमवर्गीय पण सालीना चाळीस हजारांनी शेतसारा भरला तरी आमचे दादासाहेब शेंबेकर शेतकरीच ! आहे कीं नाहीं गंमत !

मध्यमवर्गच फक्त बचत करतो व उद्योग धंद्यांना भांडवलाचा पुरवठा करतो. तेव्हां वरील चर्चेप्रमाणें मथाईंनीं पंधरा हजार रुपयेवाल्यांनाच सूट दिलेली आहे. बारा पंधरा ते पंचवीस हजार रुपयेवालाच तो खरा मध्यमवर्ग. सहा हजाराखालचे एकदा दरिद्री ठरविल्यावर त्यांना जरी सूट मागण्याचा मूलभूत हक्क जास्त असला तरी डॉ. मथाईच्या नांवानें ओरडण्याचा हक्क नाहीं ! कारण दरिद्री लोकांना सूट देण्याचें कुठें मथाईंनीं कबूल केलें आहे ! मथाई पक्के अर्थ पंडित आहेत. अहो, दरिद्री माणसाला सूट दिली तरी तो बचत कसली करणार. तो जाणार एंजल्स लॉच्या घशांत !! मथाईंनीं बजेट बसवलें आहे ' युनियन ' सरकार करतां. तुमचें—आमचें बजेट बसवण्याची जबाबदारी त्यांच्या अंगावर काय म्हणून ?

### गोदींतील कंत्राटदारीवर सहकाराचा तोडगा

बॉंबे मजदूर को. सोसायटी लि., मुंबईच्या पहिल्या ( १९४८–४९ च्या) हिशेबांत ३१,४९१ रु. नफा दिसत आहे. हमालीच्या एकूण उत्पन्नापैकीं ७५% रक्कम कामगारांना मजूरी देऊन आणि सोसायटीच्या नोकरवर्गाचा पगार व ऑफिस खर्च भागवून हा वाढावा उरला. १९४८ च्या पूर्वी मुंबईच्या गोदीमध्यें आगबोटींत उतारूंचा माल चढविण्याचें व उतरविण्याचें काम कंत्राटदार लोक मजुरांकरवी करून घेत असत. कंत्राटदार एकूण वेतनापैकीं बराच मोठा (५०%) भाग स्वतःसाठी ठेवीत, त्यामुळें कामगारांची स्थिति असहाय्य होती. १९४८ सालीं गोदी मजदूर सभा स्थापन झाली, परंतु कंत्राटदारांना तें रुचलें नाहीं. कांहीं काळ संघर्ष चालू राहून अखेर २५ ऑगस्ट, १९४८ रोजीं बॉंबे मजदूर सोसायटी अस्तित्वांत आली. १९४८–४९ मध्यें तिचें उत्पन्न २,३०,९२७ रु. होऊन खर्च १,९९,४३६ रु. झाला. २०१ भागीदारांनीं प्रत्येकीं १० रुपयांचा १ शेअर घेतलेला आहे. जून, जुलै आणि ऑगस्ट ह्या महिन्यांत काम कमी असतें तेव्हां कामगारांना रोजीं ७ आणें प्रमाणें कर्जाऊ देण्यांत आले. अशा कर्जाची रक्कम सरासरीनें ८५ रु. भरली. सोसायटीनें ५% डिव्हिडंड दिलें आहे. उतारूंकडून वाजवी तेवढीच हमाली घेऊन, २५% सोसायटीस देऊन, बाकी आपणांस सारखी वाटून घेण्याची पद्धति सभासदांनीं अंगीकारली आहे, ती स्पृहणीय आहे.

कामगारांची मासिक प्राप्ती

| महिना | वर्ष | रु. | आ. |
|---|---|---|---|
| सप्टेंबर | १९४८ | २६ | १० |
| ऑक्टोबर | १९४८ | ६९ | ० |
| नोव्हेंबर | १९४८ | १०९ | ९ |
| डिसेंबर | १९४८ | ११३ | ६ |
| जानेवारी | १९४९ | ११८ | ४ |
| फेब्रुवारी | १९४९ | १३१ | ५ |
| मार्च | १९४९ | १५० | ५ |
| एप्रिल | १९४९ | १३५ | ० |
| मे | १९४९ | १०९ | ९ |
| जून | १९४९ | १५ | १० |
| एकूण | | १,००२, | १० |
| मासिक सरासरी | | १०० | ४ |

( जुलै आणि ऑगस्टमध्यें अगदीं कमी मिळणारी मजुरी वरील हिशेबांत समाविष्ट नाहीं. )

---

### बँकेच्या अधिकाऱ्याची सेवानिवृत्ति

रिझर्व्ह बँकेचे डेप्युटि गव्हर्नर सर सेसिल आर. ट्रेव्हर हे ३१ डिसेंबर १९४९ रोजीं बँकेंतून १५ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झाले. १६ मार्च रोजीं ते इंग्लंडला जाण्यासाठी निघत आहेत. १९२१ सालीं ते प्रथम इंपीरिअल बँकेंत आले, १९३५ सालीं त्यांची रिझर्व्ह बँकेचे चीफ अकाउंटंट म्हणून योजना झाली. १९४३ सालीं त्यांची डेप्युटि गव्हर्नरांचे जागीं नेमणूक झाली.

---


### पुणें सें. को. बँक लि., पुणें शहर

**सहामाही चर्चात्मक साधारण सभा**

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडची सहामाही चर्चात्मक साधारण सभा रविवार ता. २६।३।५० रोजीं सायंकाळीं पाच वाजतां बँकेच्या मुख्य दिवाणखान्यांत ( बुधवार पेठ, लक्ष्मी रोड, पुणें शहर ) येथें भरणार आहे. तरी सदर सभेस बँकेच्या सर्व सभासदांनीं अवश्य यावें अशी विनंती आहे.

बोर्डाचे हुकुमावरून,
मो. वि. खडे.
मॅनेजिंग डायरेक्टर.

---

## दी बँक ऑफ् औंध लिमिटेड

हेड ऑफिसः—सातारा शहर.
शाखाः—औंध, आटपाडी, भवानीनगर व ओगलेवाडी.

**—बोर्ड ऑफ् डायरेक्टर्स—**

श्री. नरहर गंगाधर जोशी ( अध्यक्ष ) बी. ए., एलएल्. बी.
श्री. बा. ग. चांदोरकर, बी. ए., एलएल्. बी. | श्री. बा. रा. वर्तक.
श्री. कालिदास भाईचंद | श्री. र. दि. माजगांवकर.

मुदत ठेवी योग्य दरांत स्वीकारल्या जातात. दराबद्दल समक्ष चौकशी करावी. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**टीपः—स्त्री खातेदाराकरितां स्वतंत्र व्यवस्था करण्यांत येणार आहे.**

वा. वा. घमंडे, सी. ए. आय्. आय्. बी.
मॅनेजर

---

फोनः ३४५११ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

**उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—**

सूत, रसायनें, रंग, कच्ची कातडीं व चामडीं,
कातडी कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

**खालील मालाच्या विक्रीस सहाय्य करतेः—**

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

## मध्य सरकारच्या अंदाजपत्रकांतील विशेष गोष्टी

### भांडवलदारांना आव्हान ?

( भा. म. काळे )

पुढील वर्षाचें डॉ. जॉन मथाई यांनीं सादर केलेलें भारत सरकारचें अंदाजपत्रक, १९४७ सालीं लियाकत अल्लींच्या अंदाजपत्रकानें भांडवलदारांना दिलेला धक्का दूर करावयास समर्थ होईल असें दिसतें. डिव्हिडंड लिमिटेशन ॲक्ट ३१ मार्च नंतर चालू रहाणार नाहीं, बिझिनेस प्रॉफिट टॅक्स पूर्णपणें रद्द होणार, कंपन्यांच्या प्राप्तीवरील कर ५ आण्याऐवजीं ४ आणे केला जाईल, सुपर टॅक्स कमी करण्यांत येईल, रु. १० ते १५ हजार वैयक्तिक प्राप्तीवरील करांत सवलत, हिंदु अविभक्त कुटुंबांच्या बाबतींत कर बसविण्याच्या बाबतींत रु. ५ हजाराऐवजीं रु. ६ हजार ही मर्यादा राहील इ. गोष्टींमुळें विशेषतः भांडवलदार वर्गामध्यें उत्साही वातावरण निर्माण होईल. पोस्ट कार्ड, पाकीट, एक्सप्रेस तारा व टेलिफोन कॉल यांच्या दरांतील सवलती ह्यांचा विशेष फायदा व्यापारी वर्गालाच मिळणार आहे. भांडवलाच्या बाबतींत निर्माण झालेला 'विश्वासाचा अभाव' आतां दूर होण्याला मदत होईल हें निरनिराळ्या उद्योगपतींनीं व्यक्त केलेल्या मतावरून दिसून येतें. परंतु नवीन अंदाजपत्रकामध्यें मध्यमवर्गीयांसाठी व सामान्य जनतेसाठी कोणतीहि सवलत आढळत नाहीं. सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास यांनीं, अंदाजपत्रकांत मध्यमवर्गीयांना आनंदित करणारें कांहींहि नाहीं हें स्पष्टपणें म्हटलें आहे.

अर्थमंत्र्यांनीं आपल्या भाषणांत उत्पादन वाढविल्याशिवाय आपल्या आर्थिक जीवनाचे प्रश्न सुटणार नाहींत हें स्पष्टपणें प्रतिपादन केलें आहे. उत्पादन वाढलें म्हणजे परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थितीहि कायमची सुधारूं शकेल. सध्यां आयातीवरील नियंत्रणें व निर्गतीवर भर हे तात्पुरते मार्ग आहेत, असेंहि अर्थमंत्र्यांनीं स्पष्ट सांगितलें. हिंदी लोकांमध्यें भांडवल गुंतविण्याच्या बाबतींत जरूर तो विश्वास निर्माण होण्यासाठी परराष्ट्रीय भांडवल हिंदमध्यें धंदेवाईक दृष्टीनें व हिंदी भांडवलाशीं सहकार्य करण्याच्या दृष्टीनें गुंतविलें गेलें पाहिजे असे विचार अर्थमंत्र्यांनीं व्यक्त केले. आजच्या जगांत १९ व्या शतकाप्रमाणें भांडवलामागून राजकीय वर्चस्व निर्माण होईल अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. मजूरवर्गाबद्दलहि अर्थमंत्र्यांनीं प्रशंसोद्गार काढले आहेत. गेल्या तीन वर्षांतील परिस्थितीचा भांडवल गुंतविण्याच्या परिस्थितीवर सहाजिक प्रतिकूल परिणाम झाला, व भांडवलदार आणि मजूरवर्गाचे संबंध मूलतः योग्य आहेत व सरकार, कायदेमंडळ, वृत्तपत्रें यांनीं या दोन वर्गांबद्दल गैरसमज निर्माण करण्याचें टाळलें तर भांडवल व मजूर या दोघांकडूनहि योग्य कार्य केलें जाईल असा आशावाद अर्थमंत्र्यांनीं व्यक्त केला. भांडवल गुंतविण्याच्या कार्यांत स्टॉक एक्सचेंजमध्यें काम करणारे धंदेवाईक लोक असतात त्यापेक्षां भांडवल गुंतविणाऱ्या सामान्य व्यक्तींनें या बाबतींत लक्ष घालणें चांगलें. गेल्या वर्षी रु. ८५ कोटी कर्ज उभारण्याचा सरकारचा मानस असतां फक्त रु. ४० कोटी कर्ज उभारलें गेलें. लहान प्रमाणांतील ठेवींच्या रूपानें फक्त रु. २६ कोटी जमा झाले, परंतु अशा प्रकारें रु. ३७॥ कोटी जमा होतील असा अंदाज होता. पोस्टांतील ठेवींत बरीच घट झाली. पुढील वर्षी रु. ७५ कोटी कर्ज उभारण्याचा मानस आहे. एस्टिमेट्स् कमिटीमार्फत प्रत्यक्ष खर्चावर विशेष प्रकारें देखरेख ठेवली जाणार आहे. संस्थानी प्रदेश हिंदमध्यें समाविष्ट झाल्यामुळें अंदाजपत्रकाला यंदापासून आणखी नवीन वळण लागलें आहे. लष्करी खर्च जवळ जवळ ५० टक्के होत असून वेळ पडल्यास तो वाढवावाही लागेल. अंदाजपत्रक एकंदर आशावादी दिसतें. उत्पादनांत वाढ होऊन किंमती आटोक्यांत राहातील व भांडवलदार आणि मजूर यांजकडून जबाबदारी ओळखून कार्य केलें जाईल असा विश्वास वाटत आहे.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेची पूर्ण छाप अंदाजपत्रकावर स्पष्टपणें दिसते. मध्यमवर्ग व सामान्य जनता यांना मात्र कोणतीच सवलत मिळाली नाहीं. निदान पुढील वर्षी तरी या वर्गाला सवलत मिळावी अशी आशा आहे. यंदाचें अंदाजपत्रक हें जणूं कांहीं भांडवलदार वर्गाला एक प्रकारें आव्हानच आहे. कारण, सरकारनें आपल्याकडून भांडवलदारांच्या मार्गातील अडचणी शक्य तितक्या दूर केल्या आहेत. डॉ. जॉन मथाई यांनीं स्पष्टपणें प्रतिपादल्याप्रमाणें जास्त उत्पादनामुळेंच परराष्ट्रीय व्यापार योग्य मार्गानें सुधारेल, किंमती आटोक्यांत राहातील व भांडवल संचय होण्याला मदत होईल. या गोष्टी साध्य झाल्यानें अर्थव्यवस्थेला निश्चित चांगलें वळण लागेल. निर्वासितांचा प्रश्न बराचसा सुटला आहे. रेल्वेची वहातूक निश्चितपणें सुधारली आहे. सरकारी खर्चांत शक्य तितकी काटकसर करावयास सुरवात झाली आहे, धान्याचें उत्पादन थोडें वाढलें आहे व धान्यवसुलीहि अपेक्षेप्रमाणें होत आहे. पाकिस्तानच्या धोरणामुळें ताग व कापूस यांचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न केले जात आहेत, व गेल्या एका वर्षांत वस्तूंचे बाजारभाव अगदी अल्प प्रमाणांत बदलले, ताग व कापड या व्यतिरिक्त औद्योगिक उत्पादन वाढलें इ. सर्व गोष्टी आर्थिक परिस्थिति निश्चितपणें सुधारत आहे याच्या निदर्शक आहेत. अशा पार्श्वभूमींत सामान्य जनतेला थोडीशी सवलत मिळाल्यानें अर्थव्यवहाराला जास्त उत्तेजन मिळालें असतें.

---

## इंडस्ट्रिअल बँक लि., सांगली

( वार्षिक सभा : १९ मार्च, १९५० )

महात्माजींच्या वधानंतरच्या जाळपोळींत वरील बँकेस आगीमुळें मोठें नुकसान सोसावें लागलें. बँकेनें १९४८ सालाच्या हिशेबांतून ह्यापैकीं कांहीं, तोटा लिहून टाकला व उरलेला १०,१११ रुपयांचा तोटाहि १९४९ च्या हिशेबांतून लिहून अग्निजन्य नुकसानीचा आकडा ताळेबंदांतून काढून टाकला आहे. १९४९ सालीं घसारा काढूनहि, गेल्या ताळेबंदांतील १२०० रुपयांचा प्राथमिक खर्च लिहून टाकण्यांत आला आहे. शेअर्सच्या उतरलेल्या किंमतीसाठीं तरतूद म्हणून ४४९७ रु. बाजूस काढून ठेवण्यांत आले आहेत. नोकरवर्गासाठीं दोन महिन्यांच्या बोनसची व्यवस्था करूनहि वरीलप्रमाणें रकमांची तरतूद बँकेला करतां आली, हें अभिनंदनीय आहे. बँकेच्या खेळत्या भांडवलांत गेल्या वर्षी १ लक्ष रुपयांची भर पडून तें ५,५२,७०८ रु. झालें आहे. डायरेक्टरांनीं सभांस हजर रहाण्याचा भत्ता घेतलेला नाहीं. अशा रीतीनें, प्रतिकूल परिस्थितींतहि बोर्डानें काळजीपूर्वक व्यवहार करून बँकेची प्रगति घडवून आणली आहे. ( चेअरमन: प्रो. पी. एम. लिमये, एम. ए. सेक्रेटरी व अकाउंटंट : श्री. म. अ. कुलकर्णी कुसनाळकर, बी. ए., एल एल. बी. )

### मुंबई राज्यांत सहकारी चळवळीचा प्रसार

१९४९ च्या प्रथमार्धांत मुंबई राज्यामध्यें ६८७ सहकारी सोसायट्या रजिस्टर करण्यांत आल्या. त्यांपैकीं ४८१ ग्रामीण भागांत असून बाकीच्या २०६ शहर भागांत आहेत.

ग्रामीण भागांत शेतकी पतपेढ्यांची व विविध कार्यकारी संस्थांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. सहा महिन्यांत रजिस्टर झालेल्या एकूण ४८१ सहकारी संस्थांपैकीं ३३० संस्था याच स्वरूपाच्या आहेत. इतर संस्थांची संख्या पुढीलप्रमाणें आहे. ग्राहक ( ४२ ) उत्पादक ( २६ ) हाऊसिंग ( २७ ) जॉइंट फॉर्मिंग ( २ ) खरेदी व विक्री ( ९ ) गवळी ( १ ) बिगर शेतकी ( ३ ) सर्व साधारण ( ६ ) विणकरी ( ६ ) पीकसंरक्षण ( १२ ) चराई ( १ ) धान्य ( १६ ). आपल्या सदस्यांचें व संस्थेच्या हितचिंतकांचें आरोग्य सुधारावें म्हणून नडियाद येथें आरोग्य सहकारी मंडळ नांवाची एक अभिनव सहकारी संस्था स्थापन झाली आहे. इस्पितळें, दवाखाने व शुश्रूषागृहें सुरू करण्याचा या मंडळाचा उद्देश आहे.

### अखिल भारतीय पशुप्रदर्शनांत पिंपळे फार्मचें अपूर्व यश

लखनौ येथें नुकतेंच अखिल भारतीय पशुप्रदर्शन भरलें होतें. जळगांव तालुका डेव्हलपमेंट ॲग्रि. कोऑपरेटिव्ह असोसिएशननें चालविलेल्या पिंपळे गिलिगन कॅटल ब्रीडिंग फार्मच्या नेमाडी जातीची गाई, वळू व कालवडी मिळून ९ जनावरें प्रदर्शनांत पाठविलीं होतीं. एकूण ९ बक्षिसांपैकीं ६ बक्षिसें या जनावरांना मिळालीं. नेमाडी जातींत जोगेन नांवाचे गायीस १ ल्या नंबरचें बक्षिस मिळालें. शिवाय प्रदर्शनांत सर्वांत उत्तम जनावर म्हणून या गायीनें चँपियनशिपचा रु. ५०० किंमतीचा होळकर गव्हर्मेंट चॅलेंज कप पटकविला. एकूण आठ वर्षांपैकीं सात वर्षे फार्मच्या जनावरांनींच हा चॅलेंज कप जिंकला आहे, हें या संस्थेस भूषणावह आहे. यावरून असोसिएशन जनावरांचे पैदाशीचें काम किती उत्तम रीतीनें करीत आहे याची कल्पना येईल. जनावरांचे पैदाशीचे कार्यांत संस्थेस आर्थिक झळ सोसावी लागली आहे. अशा या राष्ट्रीय कामास सरकारनें सढळ हातानें मदत केल्यास कार्यकर्त्यांस काम करण्यास अधिक उत्साह येईल.

### महाराष्ट्र बँकेची इमारत

बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या स्वतःच्या इमारतीच्या बांधकामासाठीं टेंडरें मागविण्यांत आलीं होतीं. टेंडरें भरून पाठविणारांपैकीं श्री. आर. के. साठे यांस इमारतीचें कंत्राट मिळालें आहे, असें समजतें. इमारतीची अंदाजी किंमत २½ लक्ष रुपये आहे.

### कंपनी कायदा दुरुस्तीवर मतें

हिंदी कंपनी कायद्यांत करावयाच्या दुरुस्त्यांचा एक खर्डा भारत सरकारनें तयार करून त्यावर प्रांतिक सरकारें, संस्थानें, व्यापारी संस्था व इतर हितसंबंधी लोक, ह्यांचीं मतें मागविलीं होतीं. हीं मतें पाठविण्याची मूळ मुदत १५ डिसेंबर, १९४९ अखेर होती. ती १५ फेब्रुवारी १९५० अखेर वाढविण्यांत आली होती. आणखी मुदत पाहिजे, अशी मागणी आल्यावरून आतां ती १५ एप्रिल १९५० पर्यंत वाढविल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

### श्री. मेहता पुनः सहकारमंत्री होणार

श्री. नाईक-निंबाळकर यांचेकडून ता. २६ मार्च रोजीं सहकार व घरगुती उद्योगधंदे हे विषय काढून घेण्यांत येऊन ते अर्थमंत्री श्री. वैकुंठ एल्. मेहता यांच्याकडे सोपविण्यांत येतील.

### "दख्खनची दौलत" प्रदर्शन

हें प्रदर्शन कोल्हापूर येथील प्रख्यात खासबाग मैदानावर भरविलें जाणार आहे. तेथें भरपूर विद्युत् व पाणी पुरवठ्याच्या सोई उपलब्ध करण्यांत येणार आहेत. प्रदर्शनाची मुदत दोन आठवडे ( २३ एप्रिल १९५० ते ५ मे १९५० ) राहील.


## नोटीस

### दि बँक ऑफ कराड लिमिटेड, कराड

बँकेच्या भागीदारांची चौथी साधारण सभा रविवार तारीख २६ मार्च १९५० रोजीं दुपारीं ४ वाजतां कराड येथें बँकेच्या ऑफिसांत भरणार आहे. सदर वेळीं आपण अगत्य येणेचें करावें अशी विनंति आहे.

सभेपुढील कामें

( १ ) बँकेचा तारीख ३१-१२-४९ अखेर संपलेल्या वर्षाचा ताळेबंद व नफातोटा पत्रक आणि डायरेक्टर बोर्डाचा रिपोर्ट यांचा विचार करणें व मंजूर करणें.

( २ ) डिव्हिडंड मंजूर करणें.

( ३ ) निवृत्त होणाऱ्या ( फेर निवडणुकीस पात्र असलेल्या ) तीन डायरेक्टरांचे जागीं डायरेक्टरांची निवडणूक करणें.


( ४ ) ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

( ५ ) अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं इतर कामें

कराड
ता. १०-३-१९५०

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे हुकुमावरून
म. वि. खंडकर
मॅनेजर.

विशेष सूचनाः बँकेचीं शेअरट्रॅन्स्फर बुकें ता. १९ मार्च १९५० ते २ एप्रिल १९५० पावेतों ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहतील.




## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखाः—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.